**अकाली**

हिरव्या देठाचं,
भरल्या ऋतूचं
सरलेपण
कळलंच नाही.
तुला कळून घेताना
गळून गेलेली रात्र
पहाटेच्या ओंजळीत
उरलीच नाही.
गर्भार केळीचं,
ओसंडून वहाणारे
पिवळेपण
दिसलंच नाही .
हळुवार श्वासांचं
आश्वस्त भासांच
थांबलेपण
पाहिलंच नाही.
उरलेल्या मनाचं
पुरलेल्या देहाचं
रिकामपण
संपतच नाही.

**----------संध्या रानडे**